# पुणे महानगरपालिका
# समाज विकास विभाग
## इ. १० वी व इ. १२ वी शैक्षणिक अर्थसहाय्य योजना

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये रहाणाऱ्या इ.१० वी /इ.१२ वी मध्ये खुल्या गटातील कमीत कमी ८०% गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांना व पुणे महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी/रात्रशाळेतील विद्यार्थी/मागासवर्गीय विद्यार्थी यांनी किमान ७०% आणि ४०% अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांना किमान ६५% गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक योजना व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शैक्षणिक योजना या योजनांतर्गत पुढील शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणेत येते.

## इ. १० वी व इ. १२ वी अर्थसहाय्य अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

१. इ. १० वी/इ. १२ वी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक.

२. सीबीएसई बोर्ड किंवा आयसीएसई बोर्डची मार्कलिस्ट आणि शाळा/कॉलेजच्या लेटरहेडवरती टक्केवारीचा दाखला जोडावा.

३. शाळा सोडल्याचा दाखला /बोनाफाईड (मनपा हद्दीतील)(इ. १२ वी अर्थसहाय्य योजना करीता इ. १० वी व इ. १२ वी शाळा सोडल्याचा दाखला आवश्यक)

४. कुटुंबाचे पुणे महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला (रेशनिंग कार्डची साक्षांकित प्रत आवश्यक) तसेच ३ वर्षे वास्तव्य असलेल्या राहण्याचा पुरावा म्हणून गत ३ वर्षाचा मनपा टॅक्स पावती किंवा लाईट बिल किंवा टेलिफोन बिल (लॅण्डलाईन) किंवा झोपडी फोटो पास/झोपडी सेवा शुल्क पावती/भाडेकरू असल्यास भाडे करारनामा किंवा घर मालकाचे संमतीपत्र इ. जोडावे.

**अ.** रेशनिंग कार्ड – पत्ता व अपत्य पडताळणीकरीता आवश्यक

**ब.** टॅक्स पावती – सन २०१६–२०१७<br>
सन २०१७–२०१८<br>
सन २०१८–२०१९<br>
} ३ वर्षाच्या प्रती (प्रत्येक वर्षातील १ या प्रमाणे)

**किंवा**

**क.** लाईटबिल/टेलिफोन बिल<br>
सन २०१६–२०१७<br>
सन २०१७–२०१८<br>
सन २०१८–२०१९<br>
} प्रती वर्षाप्रमाणे ३ बिलांच्या प्रती (प्रत्येक वर्षातील १ या प्रमाणे)

५. कॉलेजमध्ये प्रवेश ॲडमिशन घेतल्याचा पुरावा–फी भरल्याची पावती व अर्जामध्ये पान क्र. ३ वर महाविद्यालय प्रमुखांची स्वाक्षरी व महाविद्यालयाचा शिक्का व नाव, फी भरल्याची पावती.

६. मागासवर्गीय असल्यास जातीचा विद्यार्थ्यांच्या नावाचा जातीचा दाखला आवश्यक. तसेच दिव्यांग (अपंग) असल्यास दिव्यांगत्वाचा (अपंगत्वाचा) दाखला आवश्यक.

७. अर्जदाराने आधार कार्ड बँक खाते समवेत लींक (संलग्न) असलेची माहिती अर्जात भरणे आहे व त्याप्रमाणे बँक पासबुक व आधार कार्ड छायांकित प्रत अर्जा सोबत जोडणे आहे. पालकांचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक (आय.एफ.एस.सी.कोड असणे आवश्यक)

वरीलप्रमाणे मुळ कागदपत्रे जोडू नयेत. साक्षांकित प्रती वरील अ.क्र.प्रमाणे फॉर्म सोबत जोडणे आवश्यक.